http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२० वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com


# मनोज जरांगे पाटलांना धक्का?

# सरकारचा जीआर निघाल्यानंतर कुणबीचे फक्त 27 दाखलेच जारी!

- मराठवाड्यात 2 सप्टेंबर ते 7 ऑक्टोबर या कालावधीत 73 अर्ज प्राप्त झाले, त्यापैकी फक्त 27 अर्ज मंजूर
- सादर केलेल्या आकडेवारीमुळे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी नेत्यांना जोरदार धक्का!!
- ओबीसी तरुणांनी केलेल्या आत्महत्यांसाठी आरक्षण संपले म्हणणारे जबाबदार असल्याचा तायवाडेंचा आरोप

## सरसकट ओबीसी प्रमाणपत्र मिळाले असते तर रांगा लागल्या असत्या!

**मुंबई : प्रतिनिधी**
2 सप्टेंबर 2025 रोजी शासन निर्णय विरोधात राज्यातील वातावरण तापलेले असतानाच राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी एक धक्कादायक आकडेवारी समोर आणली आहे. तायवाडे यांच्या मते मराठवाड्यातील आठ जिल्ह्यात 2 सप्टेंबर ते 7 ऑक्टोबर या कालावधीत फक्त 73 अर्ज प्राप्त झाले आणि त्यापैकी फक्त 27 अर्ज मंजूर झाले आहेत. सादर केलेल्या आकडेवारीमुळे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी नेत्यांना जोरदार धक्का बसणार आहे.



### बबनराव तायवाडे यांनी केलेल्या दाव्यामुळे खळबळ

ऑगस्ट 29 तारखेला मनोज जरंगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानात उपोषणाची घोषणा केली होती. या उपोषणात लाखो मराठा कार्यकर्ते सहभागी झाले. या उपोषणामुळे मुंबईतील वाहतूक जाम झाली होती आणि काही लोकांनी ही बाब हायकोर्टात नेली. हायकोर्टानंतर लगेच राज्य सरकार आणि आंदोलन कर्त्यांमध्ये चर्चेच्या फेऱ्या झाल्या. अखेर 2 सप्टेंबर 2025 शासनाने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचे जीआर मंजूर केल्यानंतर मनोज जरांगे यांचे उपोषण सुटले. आता बबनराव तायवाडे यांनी केलेल्या दाव्यामुळे खळबळ उडाली आहे.

### नेमके काय म्हणाले बबनराव तायडे

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना मराठवाड्यात कुणबी जात प्रमाणपत्रासाठी किती अर्ज आले आणि किती प्रमाणपत्र वितरित झाली याची आकडेवारी दिली. ते म्हणाले, मराठवाड्यातील आठ जिल्ह्यात 2 सप्टेंबर ते 7 ऑक्टोबर या कालावधीत फक्त 73 अर्ज प्राप्त झाले, आणि त्यापैकी 27 अर्ज मंजूर झाल्याचा दावा डॉ. बबनराव तायवाडे यांनी केला. 2 तारखेच्या जीआर नंतर 35 दिवसात मराठवाड्यात फक्त 27 अर्ज मान्य झाले. मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रमाणपत्र देण्यात आले नसल्याचा सरकारी पुरावाच तायवाडे यांनी सादर केला. तायवाडे पुढे म्हणाले की, सरसकट ओबीसी प्रमाणपत्र मिळाले असते तर रांगा लागल्या असत्या. ओबीसी नेत्यांनी अभ्यास करून वक्तव्य करावे. बेजबाबदारपणे व्यक्तव्य करू नये. ओबीसी तरुणांनी केलेल्या आत्महत्यांसाठी आरक्षण संपले म्हणणारे जबाबदार असल्याचा आरोप तायवाडे यांनी केला.



### 2 सप्टेंबर च्या जीआर मुळे ओबीसी समाज आक्रमक




हैदराबाद गॅझेटच्या माध्यमातून कुणबी जात प्रमाणपत्राचे वाटप सुरू होण्याच्या मार्ग मोकळा झाला आहे. तर सातारा गॅझेटवरही लवकरच निर्णय अपेक्षित आहे. या जीआरवर मंत्री छगन भुजबळ, विजय वडेट्टीवार, तिवार आणि इतर नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. ओबीसी समाजाकडून राज्यात ठिकाणी आंदोलने आणि मोर्चा काढण्यात आली होती. आणि यापुढेही तयारी आहे. मात्र, ओबीसी नेत्यांच्या या तीव्र विरोधाच्या पार्श्वभूमीवर डॉ. बबनराव तायवाडे यांनी सादर केलेल्या आकडेवारीने मात्र खळबळ घडून दिली आहे.




## शिवसेना अल्पसंख्याक आघाडीचा नवा आवाज

### शेख नासिब यांची महाराष्ट्र राज्य शिवसेना अल्पसंख्याक आघाडीप्रदेश प्रवक्ता पदी नियुक्ती

**सिरसाळा : प्रतिनिधी**
परळी तालुक्यातील सिरसाळा येथील रहिवासी शेख नासिब यांची शिवसेना (एकनाथ शिंदे गट) अल्पसंख्याक आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता पदी निवड करण्यात आली आहे. ही नियुक्ती शिवसेना अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष माननीय सईद (भैय्या) खान यांनी केली आहे. शेख नासिब हे अनेक वर्षांपासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांनी पक्ष संघटन, सामाजिक कार्य आणि अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नांवर सातत्याने काम करून आपली छाप निर्माण केली आहे. या नियुक्तीमुळे



परळी तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाला नवी ऊर्जा मिळाली आहे. स्थानिक कार्यकर्त्यांनी आणि ग्रामस्थांनी शेख नासिब यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## शेतकऱ्यांची दिवाळी होणार गोड, पूरग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार दिवाळीपूर्वी मदत, अजित पवारांनी दिली ग्वाही

**मुंबई : प्रतिनिधी**
राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत देणार असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले. राज्य सरकारने जाहीर केलेल्या मदतीबाबत वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता यांना सूचना दिल्या असून शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी मदत पोहचणार अशी ग्वाही अजित पवारांनी दिली आहे.



पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी केंद्रीय गृहमंत्र्यांसोबत बैठक घेण्यात आली होती. याबाबत राज्याच्या संकटात केंद्र सरकार पूर्ण सहकार्य करणार असल्याचा विश्वास अजित पवारांनी स्पष्ट केला. अतिवृष्टीसंदर्भातील अहवाल लवकरच पूर्ण होणार असून अंतिम अहवाल केंद्र सरकारला पाठविला जाणार आहे. त्यानुसार केंद्र सरकार मदत करणार असल्याची ग्वाही गृहमंत्री अमित शाह यांनी दिली असल्याचे अजित पवारांनी सांगितले. शेतकऱ्यांना जाहीर केलेले पॅकेज हे आजवरचे सर्वांत मोठे पॅकेज असल्याचेही अजित पवार म्हणाले.

ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे खूप नुकसान झाले. काही ठिकाणी संपूर्ण शेती पुराच्या पाण्यात वाहून गेली. तर काही ठिकाणी पिकाचे नुकसान झाले. यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्याला राज्य सरकारने ३१ हजार कोटींची मदत जाहीर करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र जाहीर केलेल्या रकमेतील थोडीच मदत शेतकऱ्यांना मिळणार, अशी अफवा विरोधकांनी निर्माण केली आहे. यावर राज्य सरकार करत असलेल्या चांगल्या कामाबद्दल विरोधक कधीही चांगले बोलणार नाहीत, अशी टीका पवारांनी केली आहे.

## पुढील ७२ तासांत राज्यावर कोणते मोठे संकट? प्रशासनाचा स्पष्ट इशारा!

काही दिवसांपूर्वीच राज्यात अनेक भागांमध्ये पावसाचा मोठा कहर आणि अतिवृष्टी अनुभवल्यानंतर, आता भारतीय हवामान विभागाने (IMD) पुन्हा एकदा धडकी भरवणारा अंदाज वर्तवला आहे. राज्याच्या अनेक भागांना, विशेषत: किनारपट्टीच्या प्रदेशांना, पुन्हा एकदा पाऊस झोडपून काढण्याची शक्यता आहे. रत्नागिरी, संपूर्ण कोकण आणि गोवा येथे पुढील दोन दिवस वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दक्षिण-पूर्व अरबी समुद्रात, लक्षद्वीपजवळ हवेची द्रोणीय स्थिती निर्माण झाल्यामुळे ही परिस्थिती उद्‌भवली आहे. या वादळी पावसासाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून, ही द्रोणीय स्थिती १९ ऑक्टोबरपर्यंत कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. अरबी समुद्रातील या बदलामुळे कर्नाटक आणि केरळपर्यंत समांतर क्षेत्र निर्माण होणार असून, त्याचा थेट प्रभाव कोकण किनारपट्टीच्या भागात ● पान ३ वर...

## येवता जिल्हा परिषद सर्कलमध्ये सौ. प्रगती सुरज घुले यांची उमेदवारी निश्चिततेकडे! भाजपकडून प्रबळ दावेदारी!

**केज : वसंत सोनवणे**
येवता जिल्हा परिषद सर्कल यावर्षी ओबीसी महिला राखीव सुटल्यामुळे या मतदारसंघात प्रचंड राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपकडून सौ. प्रगती सुरज घुले यांना उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

सौ. प्रगती घुले या भाजप युवा नेते सुरज भैय्या घुले यांच्या पत्नी असून, घुले कुटुंबाचा या सर्कलमध्ये मजबूत जनाधार आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचे निष्ठावान सहकारी रामकृष्ण घुले काका यांनी २०१७ पर्यंत याच सर्कलमध्ये कार्य केले असून, त्या काळात त्यांनी भाजपचा झेंडा जिल्हा परिषदेत फडकवण्यात सिंहाचा वाटा उचलला होता. घुले कुटुंबाची राजकारणातील स्वच्छ प्रतिमा, गटबाजीपासून दूर राहून विकासाभिमुख कार्यपद्धती हीच त्यांची खासियत राहिली आहे. सुरज भैय्या घुले यांनी देखील वृक्षारोपण, लंपी आजारावरील लसीकरण, जयंती निमित्त किर्तन व महाप्रसाद, भव्य बैलगाडा शर्यत, दसरा मेळाव्याचे भव्य नियोजन, तसेच सर्कलमधील गावांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करत एक सक्षम युवा नेतृत्व म्हणून ठसा उमटवला आहे.





पूर्वीच्या येवता सर्कलमधील २० पैकी तब्बल १९ गावांचा समावेश आहे. घुले परिवाराचा प्रभाव आजही कायम आहे त्यामुळे सौ. प्रगती सुरज घुले यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात असून, या सर्कलमध्ये भाजपसाठी ही उमेदवारी जिंकण्याचा विश्वासार्ह पर्याय ठरत आहे.

पक्षातील सूत्रांनुसार, "विकास, प्रामाणिकपणा आणि जनतेशी निगडित असलेले घुले कुटुंब हेच येवता जिल्हा परिषद सर्कल मध्ये भाजपची खरी ताकद", असे मत पक्षातील वरिष्ठांनी व्यक्त केले आहे. आता येवता सर्कलमध्ये सर्वांचे लक्ष सौ. प्रगती घुले यांच्या अधिकृत घोषणेवर केंद्रीत झाले आहे.

## आज बीड न.प. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बोलावली बैठक

**बीड : प्रतिनिधी**
आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात आज (दि.१६) सायंकाळी ४ वाजता बैठक आयोजित केली आहे.



या बैठकीत आगामी निवडणुकीची रणनीती, संभाव्य उमेदवारांबाबत प्राथमिक चर्चा होणार आहे. नगरपरिषद निवडणूक नियोजनबद्ध पद्धतीने लढविली जाणार आहे. त्यामुळे आजच्या बैठकीस स्थानिक कार्यकर्ते, इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.




## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# मतदानाची खरी ताकद ओळखा

दिनांक २० एप्रिल, १९३८ रोजी इस्लामपूर येथे केलेल्या भाषणात भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, निवडणुकीच्या वेळी कोणी खोट्या थापा किंवा आमिष दाखविलं तर त्याला तुम्ही भुलू नका. या वाक्याचा आशय १८व्या लोकसभेच्या उमेदवाराला मतदान करताना मतदार राजाने समजून घ्यावा. कारण बाबासाहेबांनी त्यावेळी मतदार राजाला सांगितले होते की, तुमच्या मताची किंमत मीठ-मिरची इतकी समजू नका. त्यातील सामर्थ्य ज्या दिवशी तुम्हाला कळेल, तेव्हा मत विकत घेऊ पाहणाऱ्यांइतके कंगाल कोणीच नसेल.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या स्वातंत्र्यानंतर भारताला सार्वत्रिक प्रौढ मताधिकार मिळावा यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.**

विशेष
● रवींद्र तांबे

प्रत्येक मतदार राजाला भारतीय राज्यघटनेने मतदान करण्याचा जो अमूल्य अधिकार दिलेला आहे तो निर्भीडपणे कोणत्याही आमिषाला बळी न पडता मतदान करीन असा संकल्प केला पाहिजे. तसेच, भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या स्वातंत्र्यानंतर भारताला सार्वत्रिक प्रौढ मताधिकार मिळावा यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मतदान हे नागरिकत्वासाठी आवश्यक आहे आणि ऐतिहासिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी मतदान हे राजकीय शिक्षणाचे साधन आहे हा बाबासाहेबांचा युक्तिवाद भारताच्या मतदानाच्या हक्कासाठी महत्त्वाचा आहे.

भारत देशात १८व्या लोकसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ अनुसार लोकसभेची तरतूद केली असून देशात ५४३ मतदारसंघ आहेत. आपल्या महाराष्ट्र राज्यात ४८ मतदारसंघांत पाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यापैकी १९ व २६ एप्रिल रोजी मतदान झालेले आहे. आता ७ मे रोजी रत्नागिरी-सिंधुदुर्गसह ११ मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. त्यानंतर १३ मे व शेवटी २० मे रोजी मतदान होईल. त्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदान जनजागृती केली जात आहे; परंतु आतापर्यंत महाराष्ट्र राज्यात दोन टप्प्यांत मतदान झालेले आहे. मात्र एकाही मतदार संघात १०० टक्के मतदान झालेले नाही, अशी आकडेवारी सांगते. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रात अनुक्रमे रामटेक,

नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली चिमूर आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघांत सरासरी ५४.८५ टक्के मतदान झाले. यात सर्वात जास्त मतदान गडचिरोली, चिमूर मतदारसंघामध्ये ६४.९५ टक्के झाले, तर सर्वात कमी मतदान नागपूर मतदारसंघामध्ये ४७.९१ टक्के झाले.

राज्यातील मतदानाच्या दुसऱ्या टप्प्याचा विचार करता अनुक्रमे बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या मतदारसंघांत सरासरी ५३.७१ टक्के मतदान झाले. यात सर्वात जास्त मतदान वर्धा मतदारसंघात ५६.६६ टक्के झाले असून सर्वात कमी मतदान नांदेड मतदारसंघात ५३.५३ टक्के झाले आहे. असे का? याचे उत्तर शोधत बसण्यापेक्षा पुढील मतदारसंघात मतदारांच्या मतांचा टक्का कसा वाढू शकतो याचा विचार होणे आवश्यक आहे. यासाठी मतदान जनजागृती एक काळाची गरज आहे.



सध्या सत्ताधारी व विरोधक जीवाचे रान करून कडक उन्हातान्हात लोकसभेच्या प्रचाराला लागले आहेत. सत्ताधारी आपण विकास कसा केला आणि पुढे कसा करणार आहोत याचा प्रचार करीत आहेत, तर विरोधक आपल्याला निवडून दिल्यास आपण विकास कसा साधू शकतो हे विकासाचे नवीन मॉडेल मतदारांना सांगत आहेत. याचे उत्तर ४ जून रोजी मिळेल. काही ठिकाणी 'माझे मत माझे भविष्य' व 'एका मताचे सामर्थ्य' अशा विविध स्पर्धा आयोजित करून मतदार राजाला जागृत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामध्ये गीत-गायन स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजूषा स्पर्धा, व्हीडिओ मेकिंग स्पर्धा, भित्तीचित्र स्पर्धा, घोष वाक्य स्पर्धा, सायकल रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे. मात्र मतदार राजा खुल्या मनाने मतदान करायला जात नाही हे राज्यातील दोन टप्प्यांत झालेल्या मतदानाच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.

मतदान आपला अधिकार आणि आपली जबाबदारी आहे याची जाणीव मतदार राजाला करून द्यावी. आपल्या कुटुंबातील १८ वर्षांवरील मतदार झालेल्या किंवा परिसरातील नागरिकांना मतदान करण्यासाठी जागृत करावे. ते सुद्धा आपल्या मतदारसंघात केव्हा मतदान आहे त्याची तारीख व वेळ सांगावी. त्याचबरोबर मतदान करताना मतदार ओळखपत्र न विसरता घेऊन जावे. जर मतदान ओळखपत्र नसेल तरी मतदार मतदान करू शकतात. त्यासाठी पासपोर्ट, वाहन चालक परवाना, फोटो असलेले कर्मचारी ओळखपत्र, छायाचित्र असलेले बँकांचे/टपाल कार्यालयाचे पासबुक, पॅनकार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीद्वारे दिलेले स्मार्टकार्ड, कामगार मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा स्मार्टकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, छायाचित्र असलेले निवृत्तिवेतन दस्तावेज, खासदार/आमदार/विधान परिषद सदस्य यांना दिलेले ओळखपत्र आणि आधारकार्ड यापैकी एक ओळखपत्र असल्यास मतदान करू शकतात. महत्त्वाची बाब म्हणजे त्यांचे नाव मतदान यादीत असायला हवे.

आजही काही गावांमध्ये मतदानावर बहिष्कार घातला जातो हे पाहायला मिळते. त्यासाठी त्या गावच्या समस्या कोणत्या आहेत त्या जाणून योग्य तोडगा प्रशासनाला काढता आला पाहिजे. त्या आधी त्या गावाला निवडणुकीवर बहिष्कार घालण्याची वेळ का आली? याचे उत्तर शोधावे लागेल. त्यासाठी निःपक्षपातीपणे प्रशासनाला काम करावे लागेल. तेव्हा मी मतदार आहे, तेव्हा मतदान करून योग्य उमेदवार निवडण्याचा माझा फक्त अधिकार नसून ते माझे राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी आहे, असे प्रत्येक मतदारसंघातील मतदाराला मतदान करण्यास प्रोत्साहित करावे. तरच मतदानाची टक्केवारी वाढू शकेल. तेव्हा मतदाराने निर्भयपणे मतदान करण्याचा निश्चय करावा. त्याचप्रमाणे इतरांना सुद्धा आपल्या देशातील लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन करावे, तर खऱ्या अर्थाने मतदान जनजागृती होऊन मतदार राजा आनंदाने मतदान करेल. त्यासाठी भारतीय निवडणूक आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी केली तरी गावातील विकासकामे होणे आवश्यक आहे.

# उन्हाळ्यात मुले पडतात आजारी, घ्या अशी काळजी

उन्हाळ्याच्या दिवसांत अनेकदा लहान मुले आजारी पडतात. त्यांची तब्येत खराब होण्याचे कारण म्हणजे त्यांचे शरीर पूर्णपणे मजबूत नसते. मात्र आपण जर सावधानता बाळगली तर त्यांना आजारापासन वाचवू शकतो.

### खूप पाणी द्या

● उन्हाळ्यात मुलांना खूप पाणी प्यायला द्या यामुळे ते हायड्रेट राहतील. तुम्ही त्यांना टेस्टी लागणारे लिंबू पाणीही देऊ शकता.

### मोकळे कपडे घाला

● नेहमी मुलांना सुती आणि हलके कपडे घालावेत. असे कपडे घातल्याने ते आरामात राहतील आणि त्यांना कमी गरम होईल.

### सनस्क्रीन लावा

● जेव्हा मुले बाहेर जातील तेव्हा चेहऱ्यावर आणि हातांवर सनस्क्रीन लावा. यामुळे त्यांचा सूर्याच्या किरणांपासून बचाव होईल.

### थंड जागी खेळू द्या

● उन्हापासून मुलांचा होईल तितका बचाव करा. संध्याकाळच्या वेळेस थंड ठिकाणी त्यांना खेळण्यास द्या. यामुळे ते खुश आणि ताजेतवाने होतील.

### खाण्यात फळे आणि भाज्या द्या

● उन्हाळ्यात मुलांना खाण्यासाठी हलके अन्न द्या. अनेक फळे तसेच भाज्यांचा आहारात समावेश करा.



# ताज्या स्ट्रॉबेरीपासून बनवा झटपट स्ट्रॉबेरी मिल्कशेक

उन्हाळ्यात बाजारामध्ये सगळ्या प्रकारची फळे उपलब्ध असतात. या फळांपासून सरबत, मिल्कशेक, मोजिटो किंवा इतर काही पेय तुम्ही बनवू शकता. बाजारात मिळणाऱ्या ताज्या स्ट्रॉबेरीपासून तुम्ही घरच्या घरी मिल्कशेक देखील बनवू शकता.

उन्हाळा सुरु झाला की आरोग्यासोबतच त्वचा, केस यांची खास काळजी घेणे आवश्यक असते. कारण या दिवसांमध्ये आरोग्यासंबंधित अनेक समस्या जाणवतात. उन्हातून बाहेर गेल्यानंतर घरी आल्यावर थंड पेय पिण्याची इच्छा होते. शरीराला थंडावा देण्यासाठी आपण बाहेर विकत मिळणारे शीतपेय पितो. पण याचे आपल्या शरीरावर घातक परिणाम दिसून येतात. त्यामुळे आहारात दही, ताक, फळे, भाज्या, कैरीचे पन्हे यांसारख्या पदार्थांचे सेवन केले पाहिजे. बाजारात मिळणाऱ्या फळांपासून तुम्ही घरच्या घरी झटपट सरबत किंवा मिल्कशेक बनवू शकता.

उन्हाळ्यात बाजारामध्ये सगळ्या प्रकारची फळे उपलब्ध असतात. या फळांपासून सरबत, मिल्कशेक, मोजिटो किंवा इतर काही पेय तुम्ही बनवू शकता. बाजारात मिळणाऱ्या ताज्या स्ट्रॉबेरीपासून तुम्ही घरच्या घरी मिल्कशेक देखील



बनवू शकता. हे मिल्कशेक लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं आवडेल. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही यापासून आईस्क्रीम देखील बनवू शकता. तर आम्ही तुम्हाला स्ट्रॉबेरी मिल्कशेक कसे बनवायचे याची रेसिपी सांगणार आहोत.

### साहित्य:-

१० स्ट्रॉबेरी, बर्फाचे तुकडे, १ कप थंड दूध, चवीनुसार साखर, मीठ

### कृती:-

सर्वप्रथम स्ट्रॉबेरी मिल्कशेक बनवण्यासाठी स्ट्रॉबेरी पाणी टाकून स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर स्ट्रॉबेरीचे तुकडे करून घ्या. त्यानंतर एका मिक्सरच्या भांड्यामध्ये स्ट्रॉबेरीचे तुकडे, थंड दूध आणि साखर घालून मिक्सरमध्ये पेस्ट करून घ्या. त्यानंतर त्यात बर्फाचे तुकडे घाला. तयार आहे तुमचे स्ट्रॉबेरी मिल्कशेक. मिल्कशेक तयार झाल्यानंतर एका ग्लासमध्ये मिल्कशेक ओतून घ्या. त्यानंतर त्यावर चवीनुसार मीठ टाका आणि स्ट्रॉबेरीच्या तुकड्यानी सजवा. त्यामध्ये तुम्ही आईस्क्रीम टाकून पिऊ शकता.

# अधिक पाणी पिणेही धोकादायक आहे

शरीर गरम झाल्याने अथवा डिहायड्रेशन झाल्यास भरपूर पाणी प्यावेसे वाटत असेल तर एकत्र खूप पाणी पिऊ नका. ग्लासात पाणी घेऊन त्यात मीठ घाला. यामुळे वॉटर टॉक्सिसिटी होणार नाही.

● उन्हाळ्याच्या दिवसांत घाम येत असल्याने तहानही खूप लागते. लोक डिहायड्रेशनपासून बचावासाठी सतत पाणी पित असतात. आरोग्य तज्ज्ञही यावेळेत पाणी खूप पिण्याचा सल्ला देतात. मात्र अनेकदा तहान भागवण्यासाठी भरपूर पाणी पिणेही तब्येतीसाठी हानिकारक ठरू शकते.

● भरपूर पाणी पिण्याच्या सवयीमुळे प्राणही जाऊ शकतात. याला वॉटर टॉक्सिसिटी म्हणतात. यामुळे कधीही एकत्रित भरपूर पाणी पिऊ नये.

● उन्हाळ्यात घाम खूप येत असल्याने शरीर डिहायड्रेट होते आणि सतत तहान लागते. ही तहान भागवण्यासाठी अनेकजण एक दोन ग्लास पाणी पिण्याऐवजी खूप पाणी एकदम पितात. यामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाईट बॅलन्स बिघडू लागतो आणि सोडियमचे प्रमाण अचानक कमी होते.

● रक्तात सोडियमची कमतरता जाणवल्याने शरीरात सूज निर्माण होऊ शकते. याचा योग्य वेळी उपचार झाला नाही तर मृत्यूही ओढवू शकतो.

● त्यामुळे भरपूर तहान जरी लागली असली तरी एकाच वेळेस भरपूर पाणी पिऊ नका. याशिवाय नारळपाणी, लिंबू पाणी, फ्रेश फ्रूट ज्यूस प्यायल्याने तहान भागते.



· सांज दैनिक बीड · वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## ओबीसी महाएल्गार सभेस परीट - धोबी समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे - गणेश जगताप

**बीड :** ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. 17 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 4 : 00 वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून या सभेस परीट – धोबी समाजातील बंधू – भगिनींसह युवक, युवती आणि विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन परीट – धोबी सेवा महामंडळाचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप यांनी केले आहे.

शुक्रवार दि. 17 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 4 : 00 वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महाएल्गार सभा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, ॲड. मंगेश ससाने, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होणार असून या सभेला परीट धोबी समाजातील बंधू–भगिनीसह ओबीसी समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परीट – धोबी सेवा महामंडळाचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप यांनी केले आहे.

# ओबीसीच्या न्याय हक्कासाठी रोहिणी आयोगाची अंमलबजावणी करा : प्रा. बबनराव आंधळे

**बीड : प्रतिनिधी**
महाराष्ट्रातील गरजवंत मायक्रो ओबीसी बलुतेदार व आलुतेदार असलेल्या समाजाला आजपर्यंत कोणत्याही प्रकारच्या सुविधा मिळालेल्या नाहीत. यासाठी जस्टीस रोहिणी आयोगाची अंमलबजावणी करा ओबीसीची जात निहाय जनगणना करा या प्रमुख मागणीचे निवेदन ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने प्रा बबनराव आंधळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेलद्वारे देण्यात आले

राज्यघटनेच्या कलम 340 अंतर्गत राष्ट्रपतीच्या आदेशाने स्थापन झालेल्या जस्टीस रोहिणी आयोगाने 2019 मध्ये अहवाल पूर्ण केला. तो स्वीकारून अंमलात आणावा अशी मागणी करण्यात आली. त्यामध्ये सरकारने ओबीसीची जात निहाय जनगणना करावी यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी. महाराष्ट्र शासनाने केंद्राकडे यासाठी शिफारस करावी, ओबीसी प्रवर्गातील काही जाती समूह सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास आहेत. त्यामुळे आरक्षणाचे समन्यायी पुनर्विकरण आवश्यक असल्याचे ग्रामीण युवक संघटनेचे म्हणणे आहे. सध्या ओबीसी आरक्षणाच्या 27%



मधून दहा ते पंधरा जाती सुमारे 90 टक्के आरक्षणाचा फायदा घेत आहेत. शेकडो लहान जाती मात्र या स्पर्धेत मागे पडलेल्या आहेत. शैक्षणिक, प्रशासकीय व राजकीय क्षेत्रात त्यांचा आवाज ऐकू येत नाही म्हणजे संविधानानुसार ओबीसी म्हणून ओळख असूनही आरक्षणाची लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचलेला नाही. रोहिणी आयोग लागू झाल्यानंतर या विभागणीमुळे मायक्रो ओबीसींना शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश वाढ राजकीय नेतृत्वाचा विकास व रोहिणी आयोग लागू झाल्यानंतर लहान जातींना स्थानिक व राजकीय पातळीवर राजकीय आरक्षण नेतृत्वाच्या संधी वाढतील. नवीन मायक्रो ओबीसी नेतृत्व वर्ग तयार होईल. त्यासंदर्भात बीड जिल्ह्यातील मायक्रो ओबीसी आलुतेदार बलुतेदार यांच्यासाठी रोहिणी आयोग लागू करावा या मागणीसाठी धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात येईल व तात्काळ रोहिणी आयोग लागू करावा याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात ओबीसी उपवर्गीकरण करा इतर मागासवर्गीय जातीचे अ, ब, क, ड अशा चार उपवर्गात विभाजन करून त्याची त्वरित अंमलबजावणी करा, रोहिणी आयोगाच्या समितीने काढलेले निष्कर्ष व सुचवलेल्या शिफारशी खालील प्रमाणे आहेत.

1) ओबीसीच्या केंद्रीय यादीत 2633 ओबीसी जातीचा समावेश आहे 2) ओबीसी आरक्षणाचा लाभ प्रामुख्याने प्रबळ प्रगत व वर्चस्वशाली ओबीसी जातींनाच मिळत आहे 3) वंचित व अति मागास ओबीसी जातींना ओबीसी आरक्षणाचा लाभ देण्यासाठी 27% कोट्याचे उपवर्गीकरण करण्यात यावे 4) या शिफारशीनुसार केंद्र सरकारने ओबीसी आरक्षणाची पुनर्रचना करावी 5) ओबीसीची जात निहाय जनगणना करावी या व इतर मागण्यासाठी हा लढा मायक्रो ओबीसी समाजाला न्याय देण्याचा आहे तात्काळ रोहिणी आयोग नेमण्यात यावा नसता ग्रामीण युवक संघटना तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी या निवेदनात दिला आहे.

## शेतकऱ्यांची दिवाळी होणार गोड, पूरग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार दिवाळीपूर्वी मदत, अजित पवारांनी दिली ग्वाही

● पान १ वरून ... जाणवणार आहे. त्यामुळे, किनारपट्टीच्या भागांत विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

चिपळूणमध्ये सकाळपासून हलक्या सरी

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण शहराच्या हवामानात आता स्पष्टपणे बदल जाणवू लागले आहेत. आज सकाळपासूनच शहरात हलक्या सरींची सुरुवात झाली आहे. वातावरणातील या बदलांमुळे पुढील दोन दिवस राज्यात पावसाची तीव्रता वाढणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने ( IMD ) वर्तवला आहे. या संभाव्य तीव्र पावसाच्या पार्श्वभूमीवर, रत्नागिरी जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट' ( Yellow Alert ) जारी करण्यात आला आहे. अरबी समुद्रातील बदलांमुळे कोकण किनारपट्टीवर जोरदार पावसाची शक्यता असल्याने, जिल्ह्याच्या नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आणि सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

कोल्हार बुद्रुकमध्ये वीजपुरवठा खंडित

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोल्हार बुद्रुक गावात आज विजांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे गावातील अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला असून, नागरिकांची मोठी गैरसोय झाली आहे. दुसरीकडे, रायगड जिल्ह्यामध्येही अचानक झालेल्या या मुसळधार पावसामुळे शेतकरी मोठ्या चिंतेत सापडला आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेले भातपिक धोक्यात आले आहे.

# सुरक्षिततेसह निसर्ग संवर्धनाची जबाबदारी जपत सण साजरे करा!

## कन्नड शहर पोलीस ठाण्याचे आवाहन



**कन्नड : विशाल भालेराव**
दिवाळीच्या सणानिमित्ताने नागरिकांनी आनंदाने, परंतु सुरक्षिततेची काळजी घेत सण साजरा करावा, असे आवाहन कन्नड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ सानप यांनी केले आहे. सणांच्या काळात चोरी, फसवणूक आणि अपघाताच्या घटना वाढू नयेत म्हणून नागरिकांनी सतर्क राहणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सानप यांनी पुढे सांगितले की, घरातील मौल्यवान दागदागिने रोकड व इतर मौल्यवान वस्तू सुरक्षित ठिकाणी किंवा बँकेच्या लॉकरमध्ये ठेवाव्यात. बाहेरगावी जाताना घरातील मौल्यवान वस्तू उघड्यावर ठेवू नयेत. तसेच गावाबाहेर असलेल्या वाड्यावस्त्यांवरील घरे आणि सोसायटीतील नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी.

महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी तसेच उत्सव स्थळी आपले दागिने व पर्स सुरक्षित ठेवण्याची खबरदारी घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय, आपल्या परिसरात किंवा गावात संशयित व्यक्ती ( चेहऱ्यावर मास्क बांधलेले ) अथवा संशयास्पद वाहन दिसल्यास त्याची त्वरित माहिती जवळच्या पोलीस ठाण्यास द्यावी, असे पोलीस निरीक्षक सानप यांनी स्पष्ट केले. "मंदिर परिसरात दानपेटी व मौल्यवान दागिन्यांच्या सुरक्षेसाठी विशेष रक्षक नेमावेत.

### निसर्गपूरक दिवाळीचे आवाहन

● पीआय सानप यांनी नागरिकांना निसर्गपूरक पद्धतीने दिवाळी साजरी करण्याचेही आवाहन केले आहे. फटाके फोडताना पर्यावरणाचे भान ठेवावे, ध्वनी आणि वायू प्रदूषण होणार नाही याची खबरदारी घ्यावी, तसेच स्थानिक उत्पादने आणि दिवे वापरून स्वदेशी आणि हरित दिवाळी साजरी करावी, असे आवाहन त्यांनी केले. "आपली सुरक्षा — आपली जबाबदारी" या घोषवाक्याखाली कन्नड पोलीस दलाने नागरिकांना सणांच्या काळात सतर्क राहून आनंद आणि सुरक्षिततेने सण साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

# रामलिंग पतसंस्थेकडून सभासदांना १५ टक्के लाभांशासह किराणा कीटचे वाटप

## रामलिंगचे सामाजिक दायित्व कौतुकास्पद - जिल्हा उपनिबंधक तोटावार

**वडवणी : अशोक फपाळ**
बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात नामांकित असलेल्या वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ता. वडवणी यांच्या वतीने दि. २७ सप्टेंबर २०२५ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषित केल्याप्रमाणे प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी दिपावली सणाच्या पूर्वी संस्थेच्या सभासदांना १५ टक्के प्रमाणे एकुण १५ लक्ष रुपये लाभांश रक्कमेच्या वाटपाचा तसेच सभासदांसाठीच्या जवळपास १० लक्ष रुपये रक्कमेच्या दिपावली फराळ किराणा कीटांचे वाटपाचा शुभारंभ दि. १० ऑक्टोबर २०२५ शुक्रवार रोजी सहकार क्षेत्रातील अधिकारी, संस्थेचे सर्व संचालक मंडळ व मान्यवरांच्या हस्ते उपस्थित सभासदांना लाभांश व किराणा कीट देत करण्यात आला. तरी ज्या सभासद बांधवांचे लाभांश व किराणा कीट घेवून जाणे बाकी आहे अशांनी पतसंस्थेत येवून आपली लाभांश रक्कम व किराणा कीट हस्तगत करावी असे आवाहन चेअरमन नारायणराव डिगे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, संपूर्ण बीड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात नामांकित असलेल्या वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ता. वडवणी यांच्या वतीने दि. २७ सप्टेंबर २०२५ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत तरतूद व घोषित केल्याप्रमाणे प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी संस्थेच्या सभासदांना १५ टक्के लाभांश रक्कम व दिवाळी सणासाठी फराळ किराणा कीटचे वाटप करण्याचे या वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर करण्यात आले होते.

त्याप्रमाणे आता दिपावली सणाच्या पूर्वीच संस्थेच्या सभासदांना १५ टक्के प्रमाणे एकुण १५ लक्ष ४१३ रुपये लाभांश रक्कमेच्या वाटपाचा तसेच सभासदांसाठीच्या जवळपास १० लक्ष रुपये रक्कमेच्या दिपावली फराळ किराणा कीटांचे वाटपाचा शुभारंभ दि. १० ऑक्टोबर २०२५ शुक्रवार रोजी बीड जिल्हा उपनिबंधक एस. एम. तोटावार यांच्या शुभहस्ते व बीडचे सहकार अधिकारी आर. एस. ठोसर तसेच वडवणीचे सहाय्यक निबंधक बी. एस. गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष चेअरमन नारायणराव डिगे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संस्थेचे सर्व संचालक मंडळ व मान्यवरांच्या हस्ते उपस्थित सभासदांना रोख लाभांश व किराणा कीट देत करण्यात आला. याप्रसंगी चेअरमन नारायणराव डिगे, व्यवस्थापक दिगांबरजी गुरसाळी, सर्वश्री संचालक कचरुशेठ झाडे, सर्जेराव महाराज आळणे, सुरेशराव ढवळशंक, नवनाथराव म्हेत्रे, अरुणराव गुरसाळी, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, वैजनाथ डिगे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेब मस्के, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे यांच्यासह सभासद बांधव कोष्टी समाजाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली रोकडे, गुरुप्रसाद गुरसाळी, दत्तात्रय वीर, बाबुराव खाटोकर, सुदामराव गलांडे, विठ्ठलराव भुजबळ, कैलास भुजबळ, रमेशराव लोकरे, वसंत बहिरे, रामेश्वर रेडेकर, रखमाजी डिगे, बालाजी बारड, मच्छिंद्र झाडे,




रामेश्वर लबडे, शंकर झाडे, उत्तम बागडे, कैलास गुरसाळी, वल्लभ गुरसाळी, गणेश कुरकुटे, अमोल रोकडे यांसह पतसंस्थेचे कर्मचारी सचिन म्हेत्रे, ईश्वर ढवळशंक, राहूल बागडे, अविनाश वाव्हळ, लखन टिकुळे, गणेश भुजबळ, रत्नमाला सरवदे, अरुणा पारखे, शिवाजी डिगे, अल्पबचत ठेव प्रतिनिधी ज्ञानेश्वर गुरसाळी, ज्ञानेश्वर डिगे, अजय भैरट, विजय हेंद्रे, केशव टकले, डिगांबर झाडे, शिवाजी लोकरे व इतर सभासद व ग्राहक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना बीड जिल्हा उपनिबंधक एस. एम. तोटावार म्हणाले की, आजवर या रामलिंग पतसंस्थेबध्दल केवळ ऐकून होतो. मात्र आज प्रत्यक्ष पाहिल्यानंतर जेवढे ऐकले किंबहूना त्यापेक्षाही अधिक सामाजिक दायित्वाची भावना याठिकाणी दिसून आली. अतिशय खडतर प्रवासातून सुरु झालेला हा प्रवास आज मोठ्या उंचीवर जावून ठेपला आहे ही आनंदाची बाब आहे.

यात सर्व संचालक, सभासद, खातेदार व कर्मचारी वृंद यांचा मोलाचा वाटा आहे. आज बाहेरच्या जगात काय चाललंय हे आपण पाहतो आहोत मात्र संस्था मोठी करण्याच्या आमिषाला कोणीही बळी पडू नका. संयमातूनच आणखी मोठे यशोशिखर गाठता येते. रामलिंग पतसंस्थेचा कारभार व कार्य पाहून आनंद झाला असेही शेवटी जिल्हा उपनिबंधक तोटावार म्हणाले.

दरम्यान रामलिंग पतसंस्थेच्या वतीने या दिवाळीमध्येही सर्व सभासदांना लाभांश रक्कम तसेच फराळ किराणा कीटांचे वाटपही होत असल्याने सर्व सभासदांची दिवाळी प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही गोड होत आहे. तरी ज्या सभासद बांधवांचे लाभांश व किराणा कीट घेवून जाणे बाकी आहे, अशांनी पतसंस्थेत येवून आपली लाभांश रक्कम व किराणा कीट हस्तगत करावी असे आवाहन चेअरमन नारायणराव डिगे यांनी केले आहे.

दरम्यान रोख लाभांशासह मोठ्या प्रमाणात दिवाळी फराळ बनवण्यासाठी उपयुक्त साहित्य असलेल्या किराणा कीट मिळाल्याने सर्व सभासदांची यंदाचीही दिवाळी आणखीनच गोड झाली असून त्यांच्या आनंदात अधिकची भर पडली आहे. रामलिंग पतसंस्थेच्या या दायित्व व सहकार्याबध्दल सभासद बांधवांनी पतसंस्थेच्या संपूर्ण टीमचे विशेष अभिनंदन करुन आभार मानले आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेअरमन नारायणराव डिगे यांनी केले. सुत्रसंचालन व्यवस्थापक दिगांबर गुरसाळी यांनी केले. तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार सचिन म्हेत्रे यांनी मानले.

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

विशेष

## अर्थिक विवंचनेत असलेल्या कामगारांची दिवाळी गोड करा - हमीद पठाण

पाटोदा : प्रतिनिधी



बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे सर्वत्र थैमान घातले असताना सर्व कामधंदे बंद असल्याने इमारत बांधकाम कामगार हे अर्थिक विवंचनेत सापडला आहे .दिवाळी सण कसा साजरा करावा हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे .सरकारने या कामगारांना दिवाळीसाठी अर्थिक मदत करुन दिवाळी गोड करावी अशी मागणी पत्रकार तथा समाजसेवक हमीद खान पठाण यांनी ईमेल व्दारे केली आहे .

राज्यात गेल्या चार महिन्यांपासून अतिवृष्टीमुळे कमी जास्त प्रमाणात धुमाकूळ घातला होता सर्वत्र पूर परिस्थिती निर्माण झाल्याने बीड जिल्ह्यात अधिकच्या पावसाने थैमान घातले आहे . त्यामुळे बीड जिल्ह्यातील बांधकामे कधी चालू तर कधी बंद होती .त्यात वाळु बंद . सततच्या पावसामुळे रोजंदारी मजुर हाताला काम नसल्यामुळे यामुळे इमारत बांधकाम कामगार आर्थिक अडचणीत सापडला आहे . सध्या अनेक यामुळे इमारत बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून सरकारने गोरगरिबांची दिवाळी गोड करावी अशी मागणी पेंटर तथा पत्रकार हमीदखान पठाण यांनी केली आहे .

# तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीला राज्यस्तरीय 'दिपस्तंभ-25' पुरस्कार

माजलगाव :प्रतिनिधी

सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करताना सभासदांच्या प्रगतीला प्राधान्य देणाऱ्या तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., माजलगाव या संस्थेला मोठा सन्मान मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. तर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा दिपस्तंभ पुरस्कार सन २०२४-२५ संस्थेला जाहीर झाला.

या पुरस्काराचे वितरण १३ ऑक्टोबर २०२५ रोजी गोकर्ण, कर्नाटक येथे आयोजित भव्य कार्यक्रमात करण्यात आले आहे.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत शेजूळ व उप मुख्य कार्यकारी श्री. अशोक शेजूळ यांनी दिपस्तंभ पुरस्कार स्वीकारला संस्थेच्या सर्वांगीण प्रगती, नाविन्यपूर्ण सेवा व सामाजिक बांधिलकीच्या कार्याचा सन्मान म्हणून हा गौरव मिळाल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले आहे.

### सभासदांच्या विश्वासाला मुकुट

● तुळजाभवानी अर्बनला "दिपस्तंभ" पुरस्कार संस्थेच्या या यशाबद्दल अध्यक्ष मा. चंद्रकांत शेजूळ साहेब, सीईओ मा. शहाजी शेजूळ साहेब, तसेच संचालक मंडळ व सर्व कर्मचारीवृंद यांनी आनंद व्यक्त केले.

### हा पुरस्कार म्हणजे आमच्या सभासदांच्या विश्वासाचे प्रतिक आहे -शहाजी शेजूळ

● "हा पुरस्कार म्हणजे आमच्या सभासदांच्या विश्वासाचे प्रतिक आहे. तुळजाभवानी अर्बनने सदैव सभासद व ग्राहककेंद्री काम केले आहे. भविष्यात आणखी आधुनिक सुविधा व उत्तम सेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा संकल्प आहे," असे अध्यक्ष मा. चंद्रकांत शेजूळ साहेब यांनी सांगितले.

● यशामुळे संस्थेच्या सर्व सभासदांमध्ये उत्साह नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास सीईओ मा. शहाजी शेजूळ साहेब यांनी व्यक्त केला.




# त्रिनिटी फेलोशिप चर्च, मध्ये संविधान जागर कार्यक्रम संपन्न

माजलगाव :प्रतिनिधी

येथे त्रिनिटी फेलोशिप चर्च व नवजीवन ट्रस्टच्या वतीने दिनांक १२ रविवार रोजी संविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि लोकशाही मूल्यांवर प्रकाश टाकण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली, त्यानंतर चर्चचे प्रमुख रेव्ह. डॉ विजय कापसे आणि संविधान जागरच्या वतीने देशमाने मॅडम यांनी संविधानाचे ऐतिहासिक महत्त्व, त्यातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचे मूल्य विशद केले. उपस्थित नागरिकांना अगदी सोप्या पध्दतीने संविधान विषयी माहिती देण्यात आली.

विशेष चर्चासत्रात संविधानाचे विविध कलम समजावून सांगण्यात आले. या उपक्रमात स्थानिक युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. कार्यक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि सामाजिक सलोखा वाढवणे हा होता.





कार्यक्रमाचे आयोजन त्रिनिटी फेलोशिप चर्चच्या सामाजिक विभागाने केले असून, भविष्यात अशा अनेक जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश

### संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे केले कौतुक

केज :जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश मिळवले आहे या यशाबद्दल संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार यांनी जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश मिळवले आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे केले कौतुक जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश मिळवले आहे या यशाबद्दल संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक करून खेळाडूंना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज शहरातील नामांकित जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले होते सदर खेळाडूंची जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झालेली होती.

दिनांक १५ ऑक्टोंबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या आहेत. या स्पर्धेत १४ वर्षीय वयोगटातुन मुलांमध्ये चि. अर्थ शिवराज घुले गोळा फेक प्रथम, २०० मीटर धावणे तृतीय, चि .रोनक रणधीर ठोके २०० मीटर धावणे द्वितीय, लांब उडी मध्ये द्वितीय क्रमांक पटकावला, चि .विष्णू सुधाकर केदार १०० मीटर धावणे तृतीय क्रमांक



पटकाविला. तर १४ वर्षीय वयोगटातून मुलींमध्ये कु .धनश्री अर्जुन सोनवणे हिने थाळीफेक द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

विद्यार्थी खेळाडू यांच्या उल्लेखनीय यशामागे क्रीडा मार्गदर्शक म्हणून साजिद पठाण सर, भीमाशंकर तोंडसे सर, अश्विनी दळवी मॅडम व किशोर मस्के सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या स्पर्धेतील विजेते खेळाडू विद्यार्थ्यांना विभागीय स्तरीय स्पर्धेसाठी संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार, सहसचिव यासीनभाई इनामदार, मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे, प्राचार्य दत्तात्रय हंडीबाग, बंसल क्लासेस चे सहसंचालक गोविंद ठोंबरे, मुख्याध्यापक बाळासाहेब ठोंबरे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व विजेते खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. व शिक्षकांचे कौतुक करून खेळाडूंना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.


याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज शहरातील नामांकित जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले होते सदर खेळाडूंची जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झालेली होती. दिनांक १५ ऑक्टोंबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या आहेत. या स्पर्धेत १४ वर्षीय वयोगटातुन मुलांमध्ये चि. अर्थ शिवराज घुले गोळा फेक प्रथम, २०० मीटर धावणे तृतीय, चि .रोनक रणधीर ठोके २०० मीटर धावणे द्वितीय, लांब उडी मध्ये द्वितीय क्रमांक पटकावला, चि .विष्णू सुधाकर केदार १०० मीटर धावणे तृतीय क्रमांक पटकाविला. तर १४ वर्षीय वयोगटातून मुलींमध्ये कु .धनश्री अर्जुन सोनवणे हिने थाळीफेक द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

विद्यार्थी खेळाडू यांच्या उल्लेखनीय यशामागे क्रीडा मार्गदर्शक म्हणून साजिद पठाण सर, भीमाशंकर तोंडसे सर, अश्विनी दळवी मॅडम व किशोर मस्के सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या स्पर्धेतील विजेते खेळाडू विद्यार्थ्यांना विभागीय स्तरीय स्पर्धेसाठी संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार, सहसचिव यासीनभाई इनामदार, मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे, प्राचार्य दत्तात्रय हंडीबाग, बंसल क्लासेस चे सहसंचालक गोविंद ठोंबरे, मुख्याध्यापक बाळासाहेब ठोंबरे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व विजेते खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


# 3 डिसेंबर रोजी राज्यातील 10,000 पत्रकारांची आरोग्य तपासणी करणार - एस.एम.देशमुख

### विश्व विक्रमाची नोंद होणार

मुंबई : प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वर्धापन दिनी म्हणजे ३ डिसेंबर २०२५ रोजी राज्यातील १०,००० पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्याचा संकल्प परिषदेने सोडला आहे.. एकाच दिवशी एवढ्या मोठ्या संख्येत पत्रकारांची आरोग्य तपासणी करण्याचा हा विश्व विक्रम असणार आहे असा दावा एस .एम. देशमुख यांनी केला आहे.

३ डिसेंबर १९३९ रोजी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची स्थापन झाली.. गेली दहा वर्षे ३ डिसेंबर हा दिवस राज्यात पत्रकार



आरोग्य तपासणी दिन म्हणून पाळला जातो.. पहिल्या वर्षी ३००० पत्रकारांची आरोग्य तपासणी केली गेली .त्यानंतर ही संख्या क्रमश: वाढत गेली.. गेल्यावर्षी ८००० पत्रकारांची तपासणी केली गेली.. वाढता प्रतिसाद पाहून यावर्षी १०,००० पत्रकारांच्या आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. परिषदेशी संलग्न जिल्हा आणि तालुका पत्रकार संघांनी स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि डॉक्टरांच्या मदतीने पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबियांची आरोग्य तपासणी शिबिरं घ्यावीत असं आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, आरोग्य कक्षाचे दीपक कैतके आदिंनी केले आहे.

आरोग्य तपासणीत ज्या पत्रकारांना गंभीर आजार असतील त्यांच्या पुढील उपचाराची व्यवस्था परिषदेच्यावतीने करण्यात येणार असल्याची माहिती एस .एम .देशमुख यांनी दिली.

# डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेतून महिलांचा ज्ञानदीप - गजानन मस्के

### न्यू इंग्लिश स्कूलमध्ये 'वाचन-प्रेरणा दिनी' डॉ.आशा चाटे यांचा सत्कार

शेवगाव : "वाचन ही एक अत्यंत मौलिक, मूलभूत आणि अत्यावश्यक बाब असून मानवी जीवनामध्ये विविध क्षेत्रातील येणारे ज्ञान हे वाचनातून येत असते; किंबहुना वाचनातूनच मनोबल वाढले जाते असे सांगत आत्मिक कक्षाही रुंदावतात!" असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षक गजानन म्हस्के यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील खरडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधत "वाचन- प्रेरणा दिन" कार्यक्रम घेण्यात आला. प्रारंभी डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या मंचावर विद्यालयातील शिक्षिका डॉ .आशा फड यांना नुकतीच डॉक्टरेट ही शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा



विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने प्रदान करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचा विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक अरविंद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी ज्येष्ठ शिक्षक गजानन म्हस्के सर बोलत होते. डॉ .एपीजे अब्दुल कलाम यांचे एकूण आयुष्य आणि व्यक्तिमत्व भावी अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे. डॉ. कलाम यांच्या सारख्या महान व्यक्तिमत्त्वाकडून प्रेरणा घेत महिलांनीही आपले स्थान निर्माण केले आहे. डॉ .आशा फड यांनी प्राप्त केलेली ही सर्वोच्च पदवी आमचे विद्यालय आणि संस्थेसाठी भूषणावह बाब असल्याचा गौरव ही गजानन मस्के यांनी केला.

यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना डॉ .आशा फड यांनी वाचन लेखनातून प्राप्त झालेले हे यश आपल्या सर्वांच्या सहकार्याचे असल्याचे विनम्रपणे सांगत आभार मानले .या कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वाचन-प्रेरणा दिनी डॉ. आशा फड यांचा सन्मान हा दुग्ध शर्करा योग!

डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून केवळ प्रचंड वाचनातून देश आणि जगभर यशाचे शिखर निर्माण केले. हा भारतासाठी अभिमानाचा इतिहास असून आज त्यांच्याच जन्मदिनी अर्थात 'वाचन- प्रेरणा' दिनाच्या मंचावर पीएचडी ही पदवी प्राप्त केल्याबद्दल महिला शिक्षिका डॉ. आशा फड यांचा झालेला सन्मान हा 'दुग्धशर्करा योग' आहे अशा शब्दात मुख्याध्यापक अरविंद देशमुख यांनी कौतुक केले.

# वेगवेगळ्या दोन ठिकाणी मटका जुगारावर माजलगांव शहर पोलीसांचा छापा

### 87980 रुपयाचा मुद्देमाल जप्त

माजलगाव :प्रतिनिधी

माजलगांव शहर पोलीसांना मिळालेल्या बातमीच्या आधारे पोलीसांनी माजलगांव शहरातील जुना मोंढा भागात अवैधरीत्या मटका जुगारावर दि १५ ऑक्टोबर रोजी छापा मारुन मटका जुगार खेळवणारा कृष्णा नामदेव भुजबळ रा. बंजारानगर माजलगांव याचे ताब्यातुन कल्यान मटका जुगाराचे साहीत्य व नगदी पैसे व मोबाईल असा एकुण १३४५०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यानंतर शिवाजीनगर भागात अवैधरीत्या मटका जुगार चालवणारा शाम आप्पाराव भालेकर रा. अशोकनगर माजलगांव याचेवर छापा



मारुन त्याचे ताब्यातुन कल्यान मटका जुगाराचे साहीत्य व नगदी पैसे व मोबाईल, मोटार सायकल असा एकुण ७४५३०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन दोघांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, अनिल कटके, उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोउपनि माकणे, पोहेका अस्लम शेख, माधव तोटेवाड, पोअं सुनिल गवळी, अंगद घोडके यांनी केली आहे.

# भयंकर! कफ सिरप दुर्घटनेनंतर मध्य प्रदेशातील रुग्णालयात औषधात आढळल्या 'अळ्या'

मध्य प्रदेश : मध्य प्रदेशात 'टॉक्सिक कफ सिरप'मुळे झालेल्या बालमृत्यूंच्या घटनेनंतर, आता ग्वाल्हेर येथील एका सरकारी रुग्णालयात औषधाच्या बाटलीत 'अळ्या' आढळल्याची गंभीर तक्रार समोर आली आहे. गुरुवारी (१६ ऑक्टोबर २०२५) अधिकाऱ्यांनी या माहितीला दुजोरा दिला.

ग्वाल्हेर जिल्ह्यातील मोरार शहरातील सरकारी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या एका बालकाला हे औषध देण्यात आले होते.

ज्या महिलेच्या मुलाला हे औषध देण्यात आले होते, तिने तक्रार केल्यानंतर तातडीने रुग्णालयातील 'अॅझिथ्रोमायसिन' प्रतिजैविक औषधाचा संपूर्ण साठा सील करण्यात आला आहे. तसेच, तपासणीसाठी या औषधांचे नमुने भोपाळ येथील प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. अॅझिथ्रोमायसिन ओरल सस्पेन्शन हे औषध लहान मुलांना विविध संसर्गांवर उपचारांसाठी सामान्यत: दिले जाते. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे औषध जेनेरिक होते आणि एका मध्य प्रदेश-स्थित कंपनीने त्याची निर्मिती केली होती.

## पत्रकार बालाजी जगतकर यांना पितृशोक. श्रावणराव जगतकर यांचे अल्पशा आजाराने निधन

परळी प्रतिनिधी :- पत्रकार बालाजी जगतकर यांचे वडील श्रावणराव जगतकर यांच्या अल्पशा आजाराने दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी रात्री 1:30 वाजल्याच्या दरम्यान निधन झाले त्यांचा अंत्यविधी परळी येथे दिनांक 16 ऑक्टोंबर 2025 रोजी सायंकाळी पाच वाजता दरम्यान शांतीवन स्मशानभूमी भीम नगर परळी येथे अंत्य संस्कार होणारा असून त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी, पत्नी, सुना नात वनडे मोठा परिवार आहे. स्मृतीशेष श्रावणराव जगतकर यांच्या स्मृतीस दैनिक वास्तवच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली



जात प्रमाणपत्र न दिल्यास समाज आणखी तीव्र आंदोलन छेडणार

प्रशासनाकडून दखल न घेता वेळ काढू धोरण; सर्वत्र संताप व्यक्त

# जात प्रमाणपत्रासाठी उपविभागीय कार्यालयावर मुंडन आंदोलन

माजलगाव : प्रतिनिधी

येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर महादेव कोळी समाजाला जात प्रमाणपत्र मिळावे यासाठी वारंवार अर्ज दाखल करूनही अनेक दिवसांपासून प्रशासनाकडून दखल न घेता वेळ काढू धोरण प्रशासन अवलंबित आहे.

वारंवार विनंती करूनही जात प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ होत असल्याने आज दुपारी झोपलेल्या प्रशासनाला जाग यावी यासाठी महादेव कोळी समाजाच्या वतीने उपोषण स्थळी मुंडन आंदोलन करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षापासून महादेव कोळी समाजाला जात प्रमाणपत्रापासून वंचित रहावे लागत आहे शासनाच्या विविध योजना सवलती त्याचबरोबर विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये मिळणारे लाभ बापासून देखील वंचित राहावे लागत आहे.

शासकीय सेवेमध्ये जाण्यासाठी महादेव कोळी समाज मोठ्या प्रमाणावर जात प्रमाणपत्र नसल्यामुळे मुकला आहे. त्या अनुषंगाने शासनाच्या या विविध योजनेचा लाभ मिळावा व सामाजिक प्रवाहामध्ये सम ाज बाबा या



दृष्टीने गेल्या तीन दिवसांपासून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर महादेव कोळी समाजाच्या वतीने उपोषण सुरू आहे. माजलगाव मतदार संघाम ध्येअंदाजे ५००० ते ६००० मतदार असून इतक्या मोठ्या प्रमाणात समाज असून सुद्धा प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे समाज त्यांच्या हक्कांपासून वंचित राहत आहे. (उपविभागीय अधिकाऱ्याची मुजोरी माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी, उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना जात प्रमाणपत्राच्या विषय तात्काळ मार्गी लावावा अशा सूचना तीन महिन्यापूर्वी घेण्यात आलेल्या जात प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात केल्या होत्या.

त्यानंतर उर्वरित प्रमाणपत्र वाटप काही दिवसात वाटप करण्यात येतील अशी ग्वाही उपविभागीय अधिकारी माजलगाव यांनी आमदार प्रकाश सोळंके व समाजाला दिली होती परंतु गेल्या तीन महिन्यात एकाही जात प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आलेले नाही यातून अधिकाऱ्यांचा लोकप्रतिनिधींच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्याचे काम होत आहे.